महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर विभाग, लातूर.**

**गांधी चौक, लातूर-४१३५१२.**

Email id – dydlatur@gmail.com


जा.क्र.विशिउसं/ला/कार्या -७/एसव्हीएम/२०२५/ 4830

दिनांकः- 0 3 JUL 2025

मान्यता पत्र

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

जिल्हा परिषद, लातूर.

विषय :- महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र.

नारायणा एज्यूकेशनल ट्रस्ट, बोरिवली ,मुंबई संचलित नारायणा ई टेक्नो स्कूल, सर्वे नं. २२६, लातूर, कृष्णकुंज शॉपिंग मॉल जवळ, ता.जि.लातूर.

संदर्भ :- १.मा.अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांचे पत्र क्र. एसएफएस- १०२४/प्र.क्र.८९७/एसएम-२ दि.२६.०६.२०२५.

२.सचिव, नारायणा एज्यूकेशनल ट्रस्ट, मुंबई यांचे पत्र दिनांक ३०.०६.२०२५.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नारायणा एज्यूकेशनल ट्रस्ट, बोरिवली, मुंबई या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नारायणा ई टेक्नो स्कूल, सर्वे नं.२२६, लातूर, कृष्णकुंज शॉपिंग मॉल जवळ, ता.जि.लातूर या प्राथमिक ते उच्च माध्यमिक ( इ. १ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) ही स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी अर्ज सादर केला होता.

सदर अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ आणि महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नारायणा एज्यूकेशनल ट्रस्ट, बोरिवली, मुंबई संचलित नारायणा ई टेक्नो स्कूल, सर्वे नं.२२६, लातूर, कृष्णकुंज शॉपिंग मॉल जवळ, ता.जि.लातूर या प्राथमिक ते उच्च माध्यमिक ( इ. १ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरीता, अटी व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. तथापि, मान्यता पत्राचा प्रस्ताव सादर करताना संस्थेने शाळेच्या इमारत बांधकामा बाबत दिनांक ३१.०३.२०२५ रोजीचे अंशतः भोगवटा प्रमाणपत्र सादर केले होते. ही बाब विचारात घेता विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस कोणतीही बाधा येणार नाही याअनुषंगाने हमीपत्र सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते. त्यास अनुसरुन संस्थेने दिनांक १८.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शाळेच्या इमारतीचे पूर्णतः भोगवटा प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत शिक्षण विभागात सादर करणेची हमी शपथपत्राव्दारे दिली आहे.

सदर बाब विचारात घेता नारायणा एज्यूकेशनल ट्रस्ट, बोरिवली, मुंबई संचलित नारायणा ई टेक्नो स्कूल, सर्वे नं.२२६, लातूर, कृष्णकुंज शॉपिंग मॉल जवळ, ता.जि.लातूर या प्राथमिक ते माध्यमिक ( इ. १ ली ते १० वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) करिता आता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सदर शाळेस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून संदर्भिय पत्रान्वये मान्यता पत्र देण्यात आलेले आहे. तसेच संस्थेने एक वर्षाच्या आत शाळेच्या इमारत बांधकाम बाबत पूर्णत्व भोगवटा प्रमाणपत्र सादर केल्यास उच्च माध्यमिक (इ. ११ वी ते इ. १२ वी ) करीता मान्यता देण्याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

**अटी व शर्ती :-**

१. प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निर्देशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.

२. नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तीचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तीचे पालन करणे अनिवार्य आहे.

३. सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४. शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरवात करण्यापूर्वी संबंधित जिल्हयाच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५. या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६. जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्याच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७. शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८. जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९. अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०. जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे. ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयं अर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवतील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यास, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११. शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयं अर्थसहाय्यित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२. या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याचा किंवा अधिनियमान्ये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसून केल्याच्या कारणावरून, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करू शकेल.

१३. शासन परिपत्रक दिनांक १३ मे २०२५ अन्वये शाळेतील विद्यार्थी सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात दिलेल्या सर्वसमावेशक सूचनांची शाळेने काटेकोर अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

१४. शाळेच्या इमारत बांधकामाबाबत अंशतः भोगवटा प्रमाणपत्र सादर केले असल्याने विद्यार्थी सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळा सुरु असताना इमारतीमध्ये कोणतेही बांधकाम करु नये.

१५. ज्या ठिकाणी शाळेच्या इमारतीचे बांधकाम सुरु आहे, अशा ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रवेश करु नये, यासाठी आवश्यक ती सुरक्षात्मक तरतूद (बॅरिकेट्स, सूचनाफलक, सुरक्षारक्षाची नेमणूक इत्यादी) करणे बंधनकारक राहील.

१६. शासनाव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही शर्ती.

(डॉ. दत्तात्रय मठपती )
शिक्षण उपसंचालक
लातूर विभाग लातूर

प्रतिलिपी माहितीस्तव :- मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१ सविनय सादर.

१. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-१. यांना सविनय सादर.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, लातूर.

३. अध्यक्ष/सचिव, नारायणा एज्यूकेशनल ट्रस्ट, बोरिवली, मुंबई.